# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 04/12/2019 (बुधवार)
## (सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 22 कि. मी. अंतरावर मौजा सुवरधरा शिवार येथे दिनांक 03/12/2019 चे 07.00 वा. दरम्यान भगवान तुकाराम ढोंगे, वय 40 वर्ष, रा. सुवरधरा हे ठेक्याने शेती करत होते. शेतीमध्ये गेले असता इलेक्ट्रीक करंट लागुन त्यांचा प्रेत मृत अवस्थेत पडुन दिसुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रविण गजानन राऊत, वय 35 वर्ष, रा. सुवाधरा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मणिराम नेवारे हे करीत आहे.

### अनोळखी स्त्रिचा मृत्यू

पो.स्टे. बोरी :– फिर्यादी नामे– अकुंश परसराम पंधराम, वय 49 वर्ष, राहणार बेंदोली हे त्यांच्या ठेक्याने केलेल्या शेतावर पराटी तुरीचे पिकाला पाणी देण्यासाठी गेले होते. दरम्यान फिर्यादी यांना विहीरीतील मोटार पंप पाहण्यास गेले असता त्यांना एका अनोळखी वय अंदाजे 30 ते 35 वर्ष वयोगटातील स्त्रीचे प्रेत तरंगतांना दिसुन आले.

पोलीसांना माहिती देवून प्रेत बाहेर काढले असता तिला डोक्यावर, तोंडाला व हनुवटीवर मोठया जख्मा दिसुन आले. त्यावरून अनोळखी मयत स्त्रीला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून दुखापत करून जिवेनिशी ठार मारले व तिचे प्रेत फिर्यादीने केलेल्या श्री. मनसुखलाल भाई पटेल रा. गुजरात यांच्या मालकीचे शेतातील विहीरीत आणून टाकले. फिर्यादीचे रिपोर्ट वरून पो. स्टे. ला अप क्र. 899/11 कलम 302 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

मृतकाचे वर्णन :– वय अंदाजे 30 ते 35 वर्ष, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे लांब, उंची 5 फुट 1 इंच, बांधा मध्यम, अंगात निळसर रंगाचा रेडीमेड कुर्ता, क्रिम रंगाचा लॅगीन, पायात काळसर रेगाचे सॉक्स दोन्ही हाताचे मनघटात विक्रती बांगडया, नाकात खडा, उजवे हाताचे मनगटावर इंग्रजीत ए.एस. गोंदलेले उजवे पायात काहा रंगाचा धागा बांधुन आहे. याबाबत कोणालाही माहिती असल्यास पो.स्टे. बोरी येथे दुरध्वनी क्र. 07103/262135, मोबाईल क्र. 8999686994/9284323192, पोलिस नियंत्रण कक्ष, नागपूर ग्रामीण 0712/257200 वर कृपया संपर्क साधावा.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर